# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur.dte@gmail.com

क्रमांक :- तंशिसं/विकाना/शैवि/ईबीसी/२०१६/ 2723

दिनांक :- 27 SEP 2016

प्रति,

१. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर/साकोली/ब्रम्हपूरी/गडचिरोली/आर्वी/गोंदिया

३. प्राचार्य. शा. हा. मॅ. कॅ. टे. नागपूर.

विषय :- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजनेबाबत.

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/२०१६-१७/१०१, दि. २१ सप्टेंबर २०१६.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्राचे परिपत्रक यासोबत जोडण्यांत येत आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचे अर्ज शासकीय/अशासकीय अनुदानित पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी या संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थांना सदर योजना लागू नसल्याचे सदर परिपत्रकात कळविलेले आहे. तरी आपण सादर केलेल्या ईबीसीचे अर्ज या कार्यालयातून परत घेऊन जाण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

(गुलाबराव ठाकरे)
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर .

प्रत : १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई, का.क्र. १५ यांना माहितीस सविनय सादर.

२. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.नागपूर यांना सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स - २६९२१०२
तार-EDUTECH E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक: १५/अर्थसं/ईबीसी/२०१६-१७/ ७०१
दिनांक : 21 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

विषय: खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजनेबाबत

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च, २०१६

उपरोक्त विषयाबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, सदरहू शासन निर्णयातील पात्रतेचा निकषामधील मुद्दा क्र.१ मध्ये सदर योजना ही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यानाही लागू राहील असे नमुद केले आहे. मात्र दि. १९.०९.२०१६ रोजीच्या मा. उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे सर्व सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या उपस्थितीत बैठकीत वरील मुद्दा उपस्थित करण्यात आला. सदरहू योजनेबाबत ही योजना खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी लागू आहे असे स्पष्ट केले. तरी शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी, पदविका, व पदव्युत्तर पदवी या संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना सदर योजना लागु नसल्यामुळे संबधीत विद्यार्थी , संस्था यांनी या योजनेसाठी अर्ज करु नये. आपल्या अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था प्रमूखांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई